# तहसिलदार अमरावती यांचे न्यायालय

---

## रामाक्र.एन.ए.पी.३४/रेवसा- १९ /२०१९-२०२०

---

अर्जदार:- योगीराज बिल्डर्स तर्फे श्री. सुधिर रमेश वाकोडे रा.राठी नगर, ता.जि.अमरावती.

**आदेश**

**(आदेश पारीत दिनांक- १२ / ०९/२०१९)**

अर्जदार योगीराज बिल्डर्स तर्फे श्री. सुधिर रमेश वाकोडे रा.राठी नगर, ता.जि.अमरावती यांनी रामाक्र.एन.ए.पी.३४/रेवसा-६८/२०१७-१८ आदेश दि. १७/०४/२०१८ चे आदेशान्वये निवासी प्रयोजनार्थ अकृषक मंजूर करण्यात आलेल्या मौजा रेवसा येथील शेत गट नं. २७८ भाग, २८१ भाग व ३२६/सर्व्हे नं.१०४/१/१-अ मधील प्लॉट क्र. ७५-अ ते ८१-ब, ९३-अ ते ९९-ब, ६६-अ ते ७२-ब व ८४-अ ते ९०-ब एकुण क्षेत्र ३४१५६.८२ चौ.मी. पैकी अभिन्यासा मधील बांधकाम क्षेत्र ४९७९.६६ चौ.मी. जागेवर एकुण ५६ प्लॉट वर वापराकरिता बांधकाम करण्याची परवानगी /मिळणेबाबत दिनांक ०९/०८/२०१९ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन प्रकरण पंजीबध्द करण्यात आले अर्जासह अर्जदाराने गाव नमुना सात प्रस्तावित बांधकाम अभिन्यासाच्या प्रती दाखल केल्या.

अर्जदाराने दाखल केलेला दस्ताऐवज पत्र क्र.कलि/प्रस्तु-१/बांधकाम परवानगी_ /कावि-१८२६/२०१९ दिनांक.०९/०८/२०१९ अन्वये मंजूरातीकरिता/ अभिप्रायाकरिता सहायक संचालक नगर रचना मुल्यनिर्धारण विभाग अमरावती यांचेकडे पाठविण्यात आला.

सहायक संचालक नगर रचना मुल्यनिर्धारण विभाग अमरावती यांचे पत्र क्र.बांध.पर/मौ.रेवसा/ता.जि.अम/ग.नं.२७८,२८१,३२६/ससंनर-अम/१५३२, दि.१२/०९/२०१९ अन्वये पत्रातील अटी व शर्तीनुसार शिफारसीसह बांधकाम मंजूर (**Recommanded for Approval**) अभिन्यासाच्या प्रमाणित प्रती प्रकरणांत सादर केल्या आहेत.

सहायक संचालक नगर रचना मुल्यनिर्धारण विभाग अमरावती यांचे पत्रातील अट क्र.२ करिता अर्जदाराने दिनांक २२/०८/२०१९ रोजी १००/- रु चे स्टॅम्प पेपरवर केलेले बंधपत्र प्रकरणांत दाखल केले.

करिता सहायक संचालक नगर रचना मुल्यनिर्धारण विभाग अमरावती यांचे पत्रातील अटी व शर्तीनुसार जोता पर्यंत बांधकाम करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती पुढीलप्रमाणे-**

१) आवेदकाने करुन दिलेले बंधपत्र त्यांना बंधनकारक राहील.

२) जागेच्या मालकी हक्काबाबत वाद उद्‌भवल्यास अर्जदार जबाबदार राहील.

३) प्रादेशिक योजना क्षेत्रासाठी शासनाच्या नगर विकास विभागाचे दि.२१/११/२०१३ पासुन लागु केलेल्या प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.६/२/२०११ नुसार उपरोक्त क्षेत्रासाठी सुरक्षा अनामत ठेव जमा करण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. तथापि याबाबतचे दर व कार्यपध्दती अद्याप शासनाकडून

२-

विहित करण्यात आली नाही. त्यामुळे संबंधित अर्जदार भुखंडधारक/ विकासकर्ते यांचेकडून बंधपत्र बांधकाम नकाशा मंजूरीपूर्वी सादर करुन घेण्यात यावे. सदर बंधपत्र अर्जदार भूखंडधारक/ विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहिल.

४) बांधकाम परवानगी आदेशाचे दिनांकापासून १ वर्षाकरिता वैध राहील. त्यानंतर मुदतवाढ घेणे अर्जदारास बंधनकारक राहील.

५) बांधकाम परवानगी प्रमाणेच सुरु असल्याची तपासणी नियमाप्रमाणे वेळोवेळी महसूल विभागाकडून करुन घेण्यात यावी. जोता तपासणी व भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे, अर्जदार/भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील.

६) मुळ अकृषक आदेशातील अटी व शर्ती अर्जदार/भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहतील.

७) मंजूर प्रादेशिक योजना अमरावती करिता लागू असलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीप्रमाणे बांधकाम करणे व विषयांकि‍त मंजूर वापराकरिताच सदर बांधकामाचा वापर करणे अर्जदार/ भुखंडधारक/ विकासकर्ते यांचेसह सर्व सबंधितावर बंधनकारक राहील.

८) मंजूर नकाशाप्रमाणेच बांधकाम करण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार/ भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर राहील अन्यथा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे अनाधिकृत बांधकामावर रितसर कार्यवाही सक्षम प्राधिकरणाकडून प्रस्तावित करण्यात येईल.

९) आजूबाजूचे वहिवाटीला बाधा होणार नाही याची दक्षता अर्जदार/भुखंडधारक /विकासकर्ते यांनी घेणे बंधनकारक राहील.

१०) महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार व मा.जिल्हाधिकारी अमरावती यांनी दिलेल्या निर्देशानुसार सदर बांधकाम करतांना छतावरील पावसाचे पाणी संकलन करुन त्यांचे जमीनीमधे पुनर्भरण करण्याचे प्रकल्पाचे **(Rain Water Harvesting)** बांधकाम करणे अर्जदार/ भुखंडधारक /विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील.

११) सौर उर्जेवर पाणी तापविणे व अग्निशामन व्यवस्था प्रस्तावित उदवाहीनी इ बाबीं विकसित करणे अर्जदार/भुखंडधारक/विकासकर्ते यांचे बंधनकारक राहील. या सुविधा वापरणाऱ्या सर्व सबंधितावर उक्त सुविधा विकसित झाल्यानंतर व वापरात आल्यानंतर सुस्थितीत व वापरात ठेवणे आवश्यक व बंधनकारक राहील.

१२) बांधकाम नकाशातील गणितीय चुका वा जागेवर नकाशावर नमुद केल्या व्यतिरिक्त जादा बांधकाम असल्यास त्यास सबधित देखरेख करणारे वास्तुशिल्पी व अर्जदार/भुखंडधारक/विकासकर्ते जबाबदार राहतील.

१३) प्रस्तावासोबत उपलब्ध कागदपत्राच्या आधारे मंजूरीची शिफारस केली आहे. सदर कागदपत्रे बोगस वा दिशाभुल करणारे आढळल्यास त्याचप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर बांधकाम केले असल्यास सदरची शिफारस रद्द समजण्यात यावी.

३-

१४)शासनाचे विविध स्वरुपातील कामगार कल्याण उपकरांसह अन्य कर सक्षम प्राधिकरण म्हणजे महसुल विभागाकडे अर्जदार भुखंडधारक/ विकासकर्ते यांनी भरणा करणे आवश्यक व बंधनकारक राहील.

वरील अटी व शर्तीनुसारच आवेदकास जोता पातळी (Plinth Level) पर्यंत बांधकामाची परवानगी देण्यात येत आहे. त्यानंतर जोता तपासणी प्रमाणपत्र घेवूनच पुढील बांधकाम परवानगी प्राप्त करुन घ्यावी.

तहसिलदार अमरावती

प्रतिलिपी:-

१) मा.उपविभागीय अधिकारी अमरावती यांना माहितीस सविनय सादर
२) उपअधिक्षक भुमी अभिलेख अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता समादराने सादर.
३) तलाठी मौजा रेवसा ता.जि.अमरावती यांना माहितीस रवाना.
४) योगीराज बिल्डर्स तर्फे श्री.सुधिर नांकोडे., रा. राठी नगर, ता.जि. अमरावती यांना महितीस व पुढील कार्यवाहीस रवाना.

तहसिलदार अमरावती